**विषय : म्हाडामार्फत मुंबई विकास विभाग (बी.डी.डी.) चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत दि. २५/१०/२०२१ रोजी झालेल्या मा. शक्ती प्रदत्त समितीच्या १५ व्या बैठकीचे इतिवृत्त.**

बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाच्या संदर्भात गठित करण्यात आलेल्या शक्ती प्रदत्त समितीची १५ वी बैठक दि. २५/१०/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजती श्री. सीताराम कुंटे, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे समिती कक्षामध्ये संपन्न झाली. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. श्री. मनु कुमार श्रीवास्तव - मा. अपर मुख्य सचिव, गृह विभाग
२. श्री. मनोज सौनिक - मा. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग
३. श्री. नितीन करीर - मा. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग
४. श्री. मनोज सौनिक - मा. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग
५. श्री. मिलिंद म्हैसकर - मा. प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग
६. श्री. भूषण गगराणी - मा. प्रधान सचिव (नवि-१), नगरविकास विभाग
७. श्री. महेश पाठक - मा. प्रधान सचिव (नवि-२), नगरविकास विभाग
८. श्री. एन. पी. धोटे - मा. प्रधान सचिव (विधी), विधी विभाग
९. श्री. अनिल डिग्गीकर - मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ. / प्राधिकरण
१०. श्री. संजीव कुमार - मा. अतिरिक्त आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका

सदर बैठकीत चर्चा करावयाच्या मुद्दयांची कार्यसूची सन्माननीय सदस्यांना सादर करण्यात आली होती. कार्यसूचीत नमूद केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने सांगोपांग चर्चा होऊन पुढील निर्णय घेण्यात आले.

| अ.क्र. | विषय | झालेली चर्चा व समितीचे निर्णय / निर्देश |
|---|---|---|
| १. | वरळी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाच्या सुधारित आराखडयास मंजूरी मिळणेबाबत. | वरळी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाच्या सुधारित आराखडयास शक्ती प्रदत्त समितीने म्हाडाच्या विशेष नियोजन प्राधिकरणाच्या मान्यतेच्या अधीन राहून तत्वत: मान्यता दिली. |
| २. | वरळी बीडीडी चाळ पुनर्वसन प्रकल्पाचे सुचविलेल्या बदलांमुळे प्रकल्पात होणा-या वाढीव खर्चास (प्रकल्पाचे कंत्राटदार मे. टीसीसी यांनी मान्य केलेले) मंजूरी मिळणेबाबत. | वरळी बीडीडी चाळ पुनर्वसन प्रकल्पामध्ये सुचविलेल्या बदलांमुळे प्रकल्पात होणा-या वाढीव खर्चाबाबत महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाकडून तपासणी झाल्यानंतर शक्ती प्रदत्त समितीच्या पुढील बैठकीपुढे प्रकरण सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. |
| ३. | वरळी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पांतर्गत सुधारित आराखडयामध्ये विक्रीयोग्य इमारतीमधील ३ बेजमेंट रद्द करणेबाबत. | वरळी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पांतर्गत सुधारित आराखडयामध्ये विक्रीयोग्य इमारतीमधील ३ बेजमेंट रद्द करण्याच्या प्रस्तावास शक्ती प्रदत्त समितीने म्हाडाच्या विशेष नियोजन प्राधिकरणाच्या मान्यतेच्या अधीन राहून तत्वत: मान्यता देण्यात आली. |
| ४. | वरळी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पामध्ये वाणिज्य विक्री योग्य इमारतीकरीता DCPR २०३४ च्या तरतूदीनुसार प्राप्त होणा-या वाढीव चटई क्षेत्रफळ निर्देशांकामुळे इमारतींच्या २८ मजल्यांवरून ६० मजले बांधकाम करण्याबाबतचा प्रकल्प वास्तुशास्त्रज्ञ यांचा प्रस्ताव. | वरळी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पामध्ये वाणिज्य, विक्री योग्य इमारतीकरीता DCPR २०३४ च्या तरतूदीनुसार प्राप्त होणा-या वाढीव चटई क्षेत्रफळ निर्देशांकामुळे इमारतींच्या २८ मजल्यांवरून ६० मजले बांधकाम करण्याबाबतच्या प्रस्तावास शक्ती प्रदत्त समितीने म्हाडाच्या विशेष नियोजन प्राधिकरणाच्या मान्यतेच्या अधीन राहून तत्वत: मान्यता दिली. |

૦૦੪|੨੨

| | | |
|---|---|---|
| ५. | वरळी, नायगांव व ना. म. जोशी मार्ग येथील बीडीडी प्रकल्पाकरीता मा. सचिव (रस्ते), सा. बां. विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीने कंत्राटदारास अदा करावयाचे देयकासाठी निश्चित केलेल्या Break-up of Payment Milestone यांस मंजूरी प्रदान करणेबाबत. | वरळी, नायगांव व ना. म. जोशी मार्ग येथील बीडीडी प्रकल्पाकरीता मा. सचिव (रस्ते), सा. बां. विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीने कंत्राटदारास अदा करावयाचे देयकासाठी निश्चित केलेल्या Break-up of Payment Milestone यांस मंजूरी प्रदान करणेबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभाकडून तपासणी झाल्यानंतर शक्ती प्रदत्त समितीच्या पुढील बैठकीस सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. |
| ६. | प्रकल्पाचे कंत्राटदारास देण्यात येणा-या देयकासाठी Micro Milestone Break-up निश्चित झाल्यामुळे यापुढील Redundent झालेल्या कामाचे देयक अदा करण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष / प्राधिकरण यांना देण्याबाबत. | प्रकल्पाचे कंत्राटदारास देण्यात येणा-या देयकासाठी प्रस्तावित Micro Milestone Break-up ला मंजूरी देण्याच्या प्रस्तावाबाबत निर्णय न झाल्यामुळे सदर विषय पुढील बैठकीस सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. |
| ७. | शक्ती प्रदत्त समितीच्या १४ व्या बैठकी नंतरच्या कालावधीत महाराष्ट्र शासनातर्फे बीडीडी चाळींच्या विकासासंदर्भात जारी केलेले निर्णय/आदेश माहितीसाठी.<br>(i) भाडेकरुंची पात्रता दि. ०१/०१/२०२१ रोजी पर्यंत करणेबाबत.<br>(ii) संक्रमण गाळे उपलब्ध नसल्यास निवासी / अनिवासी भाडेकरुंना प्रति माह भाडे देणेबाबत.<br>(iii) पोलीस सेवानिवासस्थानाच्या बदल्यात द्यावयाच्या पुनर्विकसित गाळयांबाबत. | उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / म्हाडा तथा सदस्य सचिव - शक्ती प्रदत्त समिती / बीडीडी चाळी पुनर्विकास यांनी उपस्थित सर्व सदस्यांना शक्ती प्रदत्त समितीच्या १४ व्या बैठकी नंतरच्या कालावधीत महाराष्ट्र शासनातर्फे बीडीडी चाळींच्या विकासासंदर्भात जारी केलेले निर्णय / आदेशांबाबत अवगत केले. |

या चर्चेनंतर मा. अध्यक्षांच्या अनुमतीने उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

(अनिल डिग्गीकर)
उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / म्हाडा तथा
सदस्य सचिव - शक्ती प्रदत्त समिती / बीडीडी चाळी पुनर्विकास.

(मिलिंद म्हैसकर)
मा. प्रधान सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन तथा
सदस्य / शक्ती प्रदत्त समिती / बीडीडी चाळी पुनर्विकास.

२९/११/२१
(सीताराम कुंटे)
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन तथा
अध्यक्ष/ शक्ती प्रदत्त समिती / बीडीडी चाळी पुनर्विकास.